**<u>नियमित दि.दावा क्र.१०३/२००८</u>**
**<u>सी.एन.आर.क्र.एमएचएएच२२०००३७७२००८</u>**
जगन्नाथ वि. छबुराव.

**<u>आदेश निशाणी ११६ खालील</u>**
(पारीत दिनांक १०/१२/२०१९)

१) प्रतिवादी कं. १ व २ यांनी प्रस्तुत अर्ज त्यांच्याविरुध्द झालेला नो क्रॉस आदेश रद्द होवून उलटतपास घेण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

२) प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे वादीने निशाणी १०८ वर सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. तथापि, महत्वाचे कागद मिळू न शकल्याने मुदत अर्ज दिला होता. दिनांक २०/०८/२०१९ रोजी माहितगार वकिल कामानिमित्त बाहेरगावी गेले. त्यामुळे उलटतपास घेवु शकले नाही. त्यामुळे न्यायालयाने दिनांक २०/०८/२०१९ रोजी नो क्रॉस आदेश पारीत केला. त्यानंतर वादीने निशाणी ११४ वर साक्षीदार अंकुश खराडेचे शपथपत्र दाखल केले. त्याचा उलटतपास घेण्यासाठी दिनांक ०४/०९/२०१९ रोजी तारीख नेमलेली होती. तथापि, माहितगार वकिल नातेवाईकांना घेवुन दवाखान्यात गेल्याने उलटतपास घेवु शकले नाही. त्यामुळे नो क्रॉस आदेश झाला. प्रतिवादींच्या वडिलांनी दावा मिळकत खरेदी घेतली असून त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. सबब, त्यांच्याविरुध्द झालेला नो क्रॉस आदेश रद्द करावा अशी विनंती केली आहे.

३) वादीने अर्जास म्हणणे देवून दावा जुना असून अर्जातील कारण योग्य व कायदेशीर नाही. वादीचे शपथपत्र दिनांक १८/०७/२०१९ रोजी दाखल केले. त्यानंतर सात तारखा मुदती देवुनही प्रतिवादीने उलटतपास घेतला नाही. त्यामुळे उलटतपास नाही असा आदेश पारीत केला आहे. प्रतिवादीने दिलेल्या मुदत अर्जावरील आदेशाची पुर्तता केली नाही. प्रतिवादींना भरपुर संधी देवूनही उलटतपास घेतला नाही. त्यामुळे अर्ज तथ्यहीन आहे. सबब, नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४) प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.बी.सी.शेळके व वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस.जे.वाकडे यांचा युक्तिवाद ऐकला.

५) प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे माहितगार विधीज्ञ महत्वाच्या कामासाठी व नातेवाईक आजारी असल्याने बाहेरगावी गेले. तसेच महत्वाचे कागदपत्र वेळेत न मिळाल्याने उलटतपास घेता आला नाही. प्रस्तुत दावा दिनांक ११/०६/२००८ रोजी दाखल केला असून दाव्यात दिनांक २०/१२/२०१० रोजी मुद्दे कायम केले आहेत. तेव्हापासून दावा चौकशीसाठी प्रलंबित आहे. वादीने पुराव्याचे शपथपत्र ११/०७/२०१९ रोजी दाखल केले. त्यानंतर उलटतपासासाठी प्रतिवादीस निशाणी १०९, ११० वरील आदेशाप्रमाणे मुदती दिल्या. तथापि, प्रतिवादीने सदर आर्जावरील आदेशाची पुर्तता केली नाही. दावा दहा वर्षाहुन जुना असल्याने तात्काळ सुनावणीसाठी घेतला आहे. त्याची जाणिव प्रतिवादीला होती. तथापि, प्रतिवादीने हजर होवून उलटतपास घेतला नाही. त्यामुळे प्रतिवादीच्या वागण्यामुळे चौकशीचे काम लांबणीवर पडले. त्यामुळे प्रतिवादीविरुध्द नो क्रॉस आदेश पारीत केलाआहे.

६) वादीने साक्षीदार क्रं. २ चे शपथपत्र दिनांक ०४/०९/२०१९ रोजी दाखल केले. त्यादिवशी प्रतिवादीने हजर होवून त्याचाही उलटतपास घेतला नाही. त्यामुळे नो क्रॉस आदेश पारीत केला. वादीने निशाणी ११५ वर पुरसिस देवुन पुरावा बंद केला. त्यानंतर प्रतिवादींनी हजर होवून प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादींचे वागणे पाहता ते जाणीवपुर्वक दाव्याची सुणावणी लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसते. प्रतिवादीच्या वागण्यामुळे सुनावणीस विलंब होत आहे. तथापी, दाव्याचे स्वरूप पाहता प्रतिवादींना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. वादी तब्बल ११ वर्षापासून न्यायाच्या प्रतिक्षेत आहे. या कारणांचा विचार करता वादींना नुकसान भरपाई देणे आवश्यक वाटते. सबब, खालीलप्रामणे आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

१) प्रतिवादी क्रं.१ व २ यांनी वादींना रक्कम रूपये १०००/- (अक्षरी एक हजार रूपये मात्र) खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर केला.

२) प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी पुढील तारखेपूर्वी खर्चाची रक्कम देवुन वादी व साक्षीदाराचा उलटतपास करावा.

सही/-

दिनांक : १०/१२/२०१९ (ध.ज. पाटील)
कर्जत. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत.